# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/३६२४

दिनांक : १४/०९/२०१८

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय – विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी आवश्यक उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र त्वरीत मिळणेसाठी तहसिलदार कार्यालयांमार्फत शिबीर आयोजित करणेबाबत...

संदर्भ – शासन पत्र क्र. शिरासं/उशि/पुवि/२०१८–१९/शिष्यवृत्ती/२३३८ दि. १४.९.२०१८

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा–या "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना" तसेच इतर शिष्यवृत्ती योजनांकरिता अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आंवश्यक आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे तसेच सदरचे प्रमाणपत्र काढणेसाठी विलंब होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यास अडचणी येत असल्याने तहसीलदार कार्यालयामार्फत शिबीर आयोजित करावे अशा सुचना मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त पत्रांन्वये दिलेल्या आहेत. सोबत पत्रांची प्रत्र जोडत आहे.

तरी, उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र त्वरीत मिळणेसाठी आपल्या कार्यक्षेत्रातील तहसिलदार कार्यालयांमार्फत शिबीर आयोजित करावे व त्या संबधी विद्यार्थ्यांना सुचना देण्यात याव्या जेणेकरून विद्यार्थ्यांना विहित मुदतीत शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणे सोईचे होईल.

कळावे,

आपला,
14/9/2018
उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :– माहितीसाठी
मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१२२१५३


क्र.उशिसं-२०१८/शिष्यवृत्ती/डीबीटी /१०१६८ दि. ११.०९.२०१८

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,

उच्च शिक्षण

**विषय :- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी आवश्यक उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र त्वरीत मिळणेसाठी तहसिलदार कार्यालयांमार्फत शिबीर आयोजित करणेबाबत..**

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना तसेच इतर शिष्यवृत्ती योजनांकरीता अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अनेक विद्यार्थ्यांकडे उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे तसेच सदरचे प्रमाणपत्र काढणेसाठी विलंब होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यास अडचणी येत आहेत.

तरी आपल्या अधिनस्त असलेल्या अकृषि विद्यापीठातील कुलसचिव, शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित - टप्पा अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य यांना त्यांचे विद्यापीठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी आवश्यक उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र त्वरीत मिळणेसाठी तहसिलदार कार्यालयांमार्फत शिबीर आयोजित करणेबाबत सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. धनराज माने)

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण

महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रत : १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.

३. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित- टप्पाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/ 2338 दिनांक : १४.०९.२०१८

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली (सा.फु.पु.वि.संलग्नित महावि.)

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

**विषय : - विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी आवश्यक उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र त्वरीत मिळणेसाठी तहसिलदार कार्यालयांमार्फत शिबीर आयोजित करणेबाबत...**

संदर्भ :- मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-२०१८/शिष्यवृत्ती/डीबीटी/१०१६४ दि. ११.९.२०१८

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना तसेच इतर शिष्यवृत्ती योजनांकरीता अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अनेक विद्यार्थ्यांकडे उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे तसेच सदरचे प्रमाणपत्र काढणेसाठी विलंब होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यास अडचणी येत आहेत.

तरी सर्व महाविद्यालय/ विद्यापीठांमार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी आवश्यक उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र त्वरीत मिळणेसाठी तहसिलदार कार्यालयांमार्फत शिबीर आयोजित करावे व त्यासंबंधी विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात. सदर पत्रानुसार त्वरीत शिबीराचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र उपलब्ध करुन द्यावे.

आपला विश्वासू

सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे करिता

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.